महाराष्ट्र शासन
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे-1.
दूरध्वनी क्र .020-26123826 Email ID:do4.igro@igrmaharashtra.nic.in

---

क्र.का.4/प्र.क्र.193/2021/10 दिनांक - 03/01/2023.

प्रति,

सर्व सह जिल्हा निबंधक वर्ग-1

सर्व दुय्यम निबंधक / ई- दुय्यम निबंधक

विषय- ई-रजिस्ट्रेशन अंतर्गत दाखल होणाऱ्या विक्री करारनाम्यांचे बाबतीत.

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे, ई-रजिस्ट्रेशन प्रणालीव्दारे ई-रजिस्ट्रेशन करण्याकरीता बांधकाम व्यावसायिकांनी फॉर्म बिल्डर सुविधेव्दारे ऑनलाईन सादर केलेल्या प्रस्तावांची ऑनलाईन तपासणी करून मंजूरी देण्याचे अधिकार सह जिल्हा निबंधक यांना आहेत. त्यानूसार सह जिल्हा निबंधक यांनी मंजूरी दिल्यानंतर, संबंधित बांधकाम व्यावसायिकांनी ई-रजिस्ट्रेशन प्रणालीचा वापर करून विक्री करारनामे नोंदणीसाठी ऑनलाईन सादर केल्यानंतर, संबंधित दुय्यम निबंधक त्या प्रकल्पाच्या रेरा नोंदणी प्रमाणपत्रामध्ये ' गावाचे नाव नाही, केवळ महानगरपालिकेचे नाव आहे ' या कारणावरून, उक्त ई-रजिस्ट्रेशन प्रलंबित ठेवत आहेत.

या संदर्भात पडताळणी करता असे दिसून येते की, नोंदणी प्रणालीतील काही महसूली गावे, रेरा नोंदणी प्रणालीतील गावांच्या यादीमध्ये समाविष्ट नसल्यामुळे हा प्रकार घडत आहे. या संदर्भात रेरा प्राधिकरणाकडे स्वतंत्ररित्या पाठपुरवठा सुरू आहे.

तथापी दरम्यानच्या काळात, प्रथम परिच्छेदामध्ये नमुद प्रकल्पांच्या (ई-रजिस्ट्रेशनसाठी सह जिल्हा निबंधक यांनी अलाहिदा मंजुरी दिलेल्या प्रकल्पांच्या) विक्री करारनाम्याची ई-रजिस्ट्रेशन मधून नोंदणी होणे प्रलंबित राहू नये या करीता संबंधित सह जिल्हा निबंधक व त्या प्रकल्पाचे ई- दुय्यम निबंधक यांना कळवण्यात येते की,

1) सह जिल्हा निबंधक यांनी उक्त रेरा नोंदणी प्रमाणपत्राच्या आधारे, रेरा संकेतस्थळावरील कागदपत्रे तसेच विक्री करारनाम्याची पडताळणी करून प्रमाणपत्रामधील प्रोजेक्ट नाव, मिळकत क्रमांक व विकसकाचे नाव इ. तपशील उक्त विक्री करारनाम्यातील संबंधित तपशिलाशी जुळत असल्याची खातरजमा करावी.

2) आवश्यक असल्यास, बांधकाम व्यावसायीकाकडून उक्त नोंदणी प्रमाणपत्र, विक्री

करारनाम्यामध्ये नमुद प्रकल्पाचेच असल्याचे प्रतिज्ञापत्र व अनुषंगिक पुरावे प्राप्त करून घ्यावे.

3) याप्रमाणे पडताळणी केल्यानंतर उक्त रेरा प्रमाणपत्रामध्ये गावाचे नाव नमुद नसले तरी ते नोंदणी प्रमाणपत्र, विक्री करारनाम्यामधील प्रकल्पाचेच असल्याची खातरजमा होत असेल तर सह जिल्हा निबंधक यांनी संबंधीत ई-दुय्यम निबंधक यांना, उक्त रेरा प्रमाणपत्र ग्राह्य धरून दस्तांची नोंदणी करण्याच्या लेखी सुचना द्याव्यात व ई-दुय्यम निबंधक यांनी त्या सुचनेनुसार दस्त नोंदणीची कार्यवाही पूर्ण करावी.

मा.नों.म.नि.यांचे मान्यतेने

XXX

(श्रावण हर्डीकर)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे

निर्गमित

(गोविंद कराड)
नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय)
महाराष्ट्र राज्य, पुणे